# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JUNE, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाईन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

मराठी साहित्याच्या क्षेत्रात अनेक मुद्यांवर निकोप चर्चा होणे आवश्यक आहे. साहित्यिक कधीही एखाद्या माणसाचे, प्रांताचे प्रतिनिधीत्व करीत नसतो. संत परंपरेपासून मराठी साहित्याने विश्वाचा विचार केला. आजच्या काळात देखील लेखकाचे साहित्य जात, धर्म, प्रांत या गोष्टी विचारात घेवून वाचले जात नाही. त्यावर लेखकाची लोकप्रियता किंवा साहित्यीक गुणवत्ता अवलंबून नसते. आपण एखादी ओळ लिहिली अथवा वाक्य उच्चारले तर त्याचा जगावर काय परिणाम होईल असा विचार करणाऱ्यांकडेच समाजाचे वैचारिक नेतृत्त्व जाते.

समाजातील बहुसंख्यांची दुःखे व अडचणी लवकर व चांगल्या पद्धतीने समजून घेण्याची क्षमता प्रतिभावंतात असते. त्यामुळेच अंधार पडला तरी अंधाराचे गाणे लिहिणारे जगप्रसिद्ध साहित्यिक आपली मुद्रा विश्वावर उमटवून जातात. लेखनाचा विषय कोणताही असला तरी साहित्य आपल्याशी बोलते असे सामान्य माणसाला वाटावे लागते. या साहित्याचे नेतृत्व करणारे लोक वैचारिक संघर्ष करतात असा पूर्वानुभव आहे. साहित्याच्या क्षेत्रातही मानवी वृत्ती आणि जीवनसंघर्ष बाजूला पडून अनुत्पादक विषयच नाचत राहिले तर त्यामुळे समाजाचे पाय मागे ओढले जातात. एखादा मुद्दा युक्तिवादाने पटवून देणे वेगळे आणि संपूर्ण परिस्थिती समजून घेवून समाजाविषयी आणि जीवनाविषयी प्रगल्भ जाणिवा निर्माण करणे वेगळे, हे लक्षात घेतले पाहिजे. उगीच वाद नको ही पापभीरु भूमिकाही टिकत नसते.

---